Impact Factor 5.939 (SJIF)
**RESEARCH HUB**
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN 2582-9173

# शंकर पाटलांच्या कथेतील अभिव्यक्ती

**डॉ. काशीनाथ वि. तरासे**
मराठी विभागप्रमुख
शंकरराव भोयर पाटील महाविद्यालय
नाचणगाव – पुलगाव
ता. देवळी जि. वर्धा
Email : tarase75@gmail.com
Mobile No. : 8007133564

Crossref DOI –

---

***सारांश :***

*स्वातंत्र्योत्तर कालखंडात शिक्षणाच्या प्रसारामुळे समाज झपाट्याने बदलत होता. समाजामध्ये होणाऱ्या या बदलांना कवेत घेत शंकर पाटलांनी मोठ्या प्रमाणात साहित्यनिर्मिती करून साहित्यक्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटविला. त्यांनी इतर वाङ्मयप्रकारांच्या तुलनेत कथा हा वाङ्मयप्रकार मोठ्या प्रमाणात हाताळून ग्रामीण कथेची निर्मिती केली व नवकथेचा प्रवाह पुष्ट करण्यात त्यात मोलाची भर घातली. त्यांच्या ग्रामीण कथेमुळे मराठी ग्रामीण कथेचेच नव्हे, तर मराठी कथेचे दालन समृद्ध झाले. एकूणच शंकर पाटलांनी ग्रामीण कथेचा चेहरामोहराच बदलून टाकला आणि अस्सल ग्रामीण माणूस त्याच्या अनेकविध समस्यांसकट आणि वृत्तिप्रवृत्तींसकट वाचकांपुढे ठेवण्याचा प्रयत्न केला.*

**बीजशब्द :** शंकर पाटील, घालमेल, गारवेल, शिवा, आकृतिबंध

---

**कथेचा घाट :**

शंकर पाटलांच्या कथांचा विचार करताना असे दिसून येते की, त्यांनी संवाद, विरोध, समतोल ह्या तत्त्वांचा वापर आपल्या कथांमध्ये केलेला आहे. उदा. 'वेण' या कथेतील भागा जेव्हा हातकलंगड्याचा बाजार आटोपून घराच्या ओढीने निघते, पण एकाएकी तिला अस्वस्थ वाटायला लागते म्हणून ती रस्त्याच्या कडेला लिंबाच्या झाडाला पाठ लावून बसते. तेव्हा भागाच्या कानांवर शब्द येतात, ''बाई भागा, एकटीच का बसलीस गं?'' (कथा : वेणा, कथासंग्रह : घालमेल, पृ. ३) भागाने वळून पाहिल्यावर तिला कुंभाराची तानू, जुगळ्याची तारा, सुताराची रत्ना आणि चंद्रा माळीण या स्त्रिया दिसतात. यांपैकी फक्त चंद्रा माळीण भागाला मदत करण्यासाठी समोर येते. हे सर्व चित्र रेखाटताना पाटलांनी कृत्रिम भाषेचा वापर केलेला दिसत नाही. तर त्यांनी अगदी वास्तविकता 'वेणा' या कथेतून रेखाटली आहे. म्हणून ही कथा वाचताना वाचक विचारप्रवृत्त होतो. तसेच 'गारवेल' या कथेतून शिवाचा जीवन जगण्याचा संघर्ष उभा राहतो. सातत्याने दुष्काळ पडला तर कामगारवर्गाला पोट भरण्यासाठी जिथे काम मिळेल त्या गावाचा आसरा घ्यावा लागतो. अशा स्थितीत अनेकांनी आपले गाव सोडून दुसऱ्या गावाचा आश्रय घेतला; पण शिवाकडे बऱ्यापैकी शेतीवाडी असल्यामुळे तो गाव सोडून जाऊ शकत नाही. मात्र कुटुंबाला कसे जगवायचे, त्यांना काय खाऊ घालायचे हा प्रश्न शिवापुढे उभा राहतो. म्हणून लाचार होऊन तो मिठारी अण्णाकडे जातो आणि आपली वास्तविक परिस्थिती सांगतो, ''अण्णा, आज एवढी नड भागवा. आज चार रोज झालं, घरात चूल पेटली न्हाई बघा.'' (कथा : गारवेल, कथासंग्रह : गारवेल, पृ. ७) या विधानातून शिवाच्या दु:खाची कल्पना वाचकाला येते. अशारीतीने शंकर पाटलांच्या कथेची मांडणी वाचकाच्या हृदयाला हात घालणारी

आहे. त्यांच्या कथालेखनाविषयी नागनाथ कोतापल्ले म्हणतात, ''स्वप्नरंजनात आणि ध्येयवादित्वात रमलेल्या आणि छायाचित्रणात्मक पद्धतीने प्रकट होणाऱ्या मराठी ग्रामीण कथेला आधुनिक नवकथेबरोबर आणण्याचे श्रेय नि:संशय शंकर पाटील ह्यांचेच!''[१] पाटलांच्या कथेत भावनात्मक लयाची मांडणी दिसून येते. तसेच अनुभवही अस्सल पद्धतीने रेखाटला आहे. त्यांच्या कथा वाचताना विस्कळीतपणा दिसून येत नाही, तर त्या एकामागून एक एकसंघ असल्याचे जाणवते. हे त्यांच्या कथेचे वेगळेपण आहे. त्यांनी रेखाटलेली पात्रे, निवेदनाचे तंत्र, संवाद, निसर्गप्रतिमांचा वापर, घटना, प्रसंगांची एकसंघ मांडणी, ग्रामीण भाषेचा वापर इत्यादींच्या आखीव–रेखीव रचनेतून त्यांच्या कथांना एक विशिष्ट आकृतिबंध प्राप्त झाला आहे.

**प्रारंभ आणि शेवट :**

कोणत्याही साहित्यकृतीचे लेखन करताना प्रारंभ आणि शेवटाला महत्त्वाचे स्थान असते. मग तो कोणताही वाङ्यमप्रकार असो. यासंदर्भात डॉ. सुधा जोशी म्हणतात, ''कथेची सुरूवात आणि तिचा शेवट निश्चित करून पात्रांचे स्वभावविशेष, त्यांची उद्दिष्टे आणि त्यांच्या प्रत्यक्ष कृतिउक्ती यांची त्यानुसार विशिष्ट रचना साधून येथे कथानकाची संघटना झालेली दिसते.''[२] शंकर पाटलांच्या कथांचा विचार करताना त्यांच्या कथेच्या शीर्षकांतूनच कथेच्या आशयाची कल्पना वाचकाला येते. त्यांच्या 'पाहुणी' या कथेतून रत्नाची घालमेल दिसून येते. रत्नाच्या बापाची अनेक महिन्यांपासून प्रकृती ठीक नसते; पण तिला कुणी निरोप देत नाही. सर्व भावांचे लग्न झाल्यावर रत्नाला आपले माहेर परके वाटायला लागते. म्हणून ती आपला राग व्यक्त करताना म्हणते, ''हे देवा, काय ऐकायची आणि काय बघायची पाळी आणलीस तू ही? घरचं परकं झालं आणि परकं घरचं होऊन बसलं! कसली सत्ता राहिली नाही.'' (कथा : पाहुणी, कथासंग्रह : खुशखरेदी, पृ. ८६) या विधानातून रत्नाच्या मनाची तगमग दिसून येते.

शंकर पाटलांच्या कथेचा प्रारंभ होत असताना एखादी गोष्ट सहजतेने सांगावी ह्या पद्धतीनेच तिचा प्रारंभ होत असतो आणि तिचा शेवट प्रश्न निर्माण करून त्याचे उत्तरही सूचकपणे देऊन कथेचा शेवट होतो. त्यांच्या 'चिंधी' या कथेतून प्रारंभीचा चंद्राचा संवाद हा सहजतेचा आहे. ती आपल्या गरिबीच्या दु:खाची कहाणी सांगते. वयात आलेल्या पोरीला साधं एखादं पातळ नाही की तिच्या मनासारखं तिला काहीही मिळालेलं नाही, म्हणून ती आपल्या आईसोबत अबोला धरते. याबाबतीत आपल्या मुलीचे काहीच चुकले नाही, उलट आपल्या नवऱ्याला दोष देताना चंद्रा म्हणते, ''मालकानं दारू पिऊन रीण करून ठेवलं नसतं, जमिनी गेल्या नसत्या तर असं का झालं असतं? आपल्या हातानं त्यानं सगळं वाटोळं करून ठेवलं होतं आणि आता पाय वर धरून सोप्याला बसून राहिलाय! नुसतं बसून खायला पाहिजे.'' (कथा : चिंधी, कथासंग्रह : घालमेल, पृ. १९)

दारूमुळे अनेकांचे संसार देशोधडीला लागले. दारू हा समाजाला लागलेला एक कलंक आहे. तो समाजातून कायमचा हद्दपार झाला पाहिजे, असे सूचकपणे पाटलांची कथा उत्तरही देते. म्हणूनच कथावाङ्मयामध्ये प्रारंभाला आणि शेवटाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. शंकर पाटलांनी या गोष्टीचे भान ठेवूनच कथालेखन केल्यामुळे त्यांच्या सर्वच कथा वाचकांच्या मनाचा ठाव घेतात.

**निवेदनाचे तंत्र :**

निवेदन हे कथेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होय. ''निवेदन किंवा कथन हे कथेचे एक व्यवच्छेदक वैशिष्ट्य होय.''[३] निवेदन वेगवेगळ्या पातळीवरून केले जाते. त्यामध्ये कथन, वर्णन, भाषा, संवाद या घटकांचा समावेश असून या घटकांच्या वापरातून आकाराला येणाऱ्या निवेदनातून घटनाप्रसंग, पात्र व वातावरण यांची निर्मिती होत असते. या घटकांच्या आधारे कथाकार कथेतील समग्र भावविश्वाला

Research Hub International Journal

तोलत असतो. निवेदनासाठी साधारणत: प्रथमपुरूषी किंवा तृतीयपुरूषी निवेदनपद्धती वापरण्यात येते. शंकर पाटलांनी प्रथमपुरूषी व तृतीयपुरूषी अशा निवेदनपद्धती कथेनुसार स्वीकारलेली दिसून येतात. त्याचबरोबर कथावस्तूंशी पूर्णपणे एकरूप होऊन निवेदन करणे किंवा अलिप्त राहून निवेदन करणे हे निवेदनाचे दोन्ही प्रकार आलेले आहेत.

शंकर पाटलांच्या कथेमध्ये स्त्रीला प्राधान्य दिले आहे. ग्रामीण स्त्री तर पाटलांच्या कथेचा चिंतनाचाच विषय आहे. तिचे कौटुंबिक जीवन, तिच्या वाट्याला आलेले श्रमाचे काम. ही स्त्री स्वत:साठी कधी जीवन जगत नाही तर कुटुंबासाठी तिने स्वत:ला वाहून घेतले आहे. हा संघर्ष मांडत असताना त्यांनी प्रथमपुरूषी निवेदनपद्धतीचा वापर केलेला आहे. 'मागणी' या कथेतून जनाईच्या दु:खाचा प्रत्यय येतो, ''आलोय बाई तुमाकडनीच!''

''ते का जी?''

''काय सांगू धुरपा?''

''काय झालं जी?''

''काइ न्हाई.''

''बाई, हे दिस एक असं कडसरीचं आल्यात. येऊने ती पाळी आम्हावर आलिया बग. उद्या कुटं कामाला जानार असला तर मला सांग. त्यात कसली आलिया लाज आणि अब्रू? वेळ आल्यावर कराय नगो?'' (कथा : मागणी, कथासंग्रह : खुशखरेदी, पृ. ९५) जनाईचे दु:ख सांगत असताना शंकर पाटलांनी प्रथमपुरूषी निवेदनाचा वापर केलेला दिसून येतो. त्यांच्या कथेतील पात्रे भाष्य करताना आपल्या जीवनातील दु:खाच्या, सुखाच्या विविध तऱ्हा सांगतात. आपल्या मनोभूमिकेतील व्यथा—वेदनांना साकारताना त्यामागील कारणांचा शोध घेत असतात आणि परिस्थितीला सामोरे जातात.

**भाषा :**

साहित्यनिर्मितीची भाषा कशी असावी या बाबतीत निश्चित नियम सांगणे कठीण आहे. मानवी भावना आणि विचारांना शब्दांच्या माध्यमातून व्यक्त करणे किंवा सांगणे हे खऱ्या अर्थाने भाषेचे काम आहे. ना. सी. फडके म्हणतात, ''लेखकाच्या विचारांचा व भावनांचा ओघ जितका जोमदार असेल तितका त्याच्या भाषेला ओघ प्राप्त होईल.''[४] एकमेकांचे विचार एकमेकांपर्यंत पाहोचविणे हे भाषेचे काम असते. शंकर पाटलांच्या कथेतसुद्धा हा विशेष दिसून येतो. त्यांच्या कथेतील भाषा ग्रामीण माणसाची आहे. त्यांनी अस्सल ग्रामीण माणूस आपल्या कथेतून उभा केला आहे. त्याचे सुख—दु:ख त्याच्याच भाषेत मांडले आहे; पण हे करीत असताना त्यांची भाषा बेगडी वाटत नाही. त्यांच्या 'हरिआबा' या कथेतून हरिआबा या व्यक्तीच्या भावविश्वाचा शोध घेताना ही व्यक्ती कुठून आली, तो कोणत्या गावाचा, याचा ठिकाणा नाही. तो कोणाकडेही काबाडकष्ट करून जगतो. जे दिले त्यात समाधान मानणाऱ्या वृत्तीचा हा माणूस; पण मालकाच्या गुराढोरांना जगविण्याठी तो दुसऱ्याच्या शेतातून चाऱ्याची चोरी करतो. म्हणून त्याला कोणी कामावर ठेवत नाही. अशावेळी तो आबा कुलकर्णी सावकाराकडे जातो आणि व्याकूळ अंत:करणाने म्हणतो, ''आबा गावानं वाळत टाकलंय. पोटाकडं हाल व्हायला लागल्यात. तुम्ही देशीला ते खाऊन चाकरी करतो. मला चाकरी ठेवा.'' (कथा : हरिआबा, कथासंग्रह : धुळाक्षरे, पृ. ५१) या विधानातून ग्रामीण माणसाचे अस्सल रूप पाटलांनी या कथेतून मांडले आहे. ही भाषा कशी दुधारी शस्त्राचे काम करू शकते हे यातून दिसून येते.

**शैली :**

कथावाङ्मयामध्ये शैलीला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. शैलीमुळे साहित्यकृतीला एक परिपूर्ण आकार आल्याचे जाणवते. शैलीमुळे आशयाची गुणवत्ता वाढते. कोणत्याही साहित्यकृतीच्या आशयापर्यंत पोहचण्याचा मार्ग म्हणजे शैली होय. यासंदर्भात डॉ. यशवंत मनोहर म्हणतात, ''आशय–अभिव्यक्तीची सेंद्रियता, आशय–जीवनार्थ आणि कलानिर्मितीची पद्धती, साहित्यिकाची जीवनदृष्टी आणि त्याच्या काळाचे जीवनवास्तव यांचे एकरूप अस्तित्व म्हणजे शैली होय.''[५] या दृष्टीने शंकर पाटलांच्या कथेतील भाषा ही त्यांची शैली आहे. हा तिचा गुणविशेष आहे. कथासृष्टीतील कथानक, व्यक्तिचित्रण, वातावरण, संवाद, निवेदनातील सहजता यांमुळे पाटलांच्या कथेतील भाषेला एक वेगळी शैली प्राप्त झाली आहे.

''अरे, इच्छा तिथं मार्ग असलाच पाहिजे.''

''पर न्हाई की साब मार्ग.''

''जीप जाईल तीथवर ने. पुढं चालत जाऊ.''

तो म्हणाला, ''सा मैल चालत जावं लागेल बगा.''

''चालत तर जाता येईल ना?''

''ईल; पर तानपट निघंल हो! सा मैल जायाचं, सा मैल याचं म्हणजे काय थोडं झालं?'' (कथा : एक जोरदार कार्यकर्ता, कथासंग्रह : शाळा एके शाळा, पृ. २७) कमी शब्दांतून जास्त आशय सांगण्याचा प्रयत्न या कथेतून झालेला दिसतो. कथेचा आशय पाटलांनी ग्रामीण शैलीमध्ये मांडल्यामुळे या कथेला एक भारदस्तपणा लाभलेला आहे. त्यामुळे त्यांच्या कथेला वेगळे वळण मिळते. वाचकांच्या मनावर कथेचा ठसा उमटतो.

**व्यक्तिचित्रण :**

व्यक्तिचित्रण हे कथेमध्ये महत्त्वाचे अंग आहे. घटना, प्रसंगनिर्मिती, वातावरण, पात्राचे स्वभावदर्शन हे सर्व घटक महत्त्वाचे असतात. कधी कधी पात्रांमुळे घटना व कृती निर्माण होतात, तर कधी घटनांचा प्रभाव मानवी जीवनावर व व्यक्तिमत्त्वावर पडतो. त्यामुळे कथानकाबरोबर व्यक्तिचित्रणही महत्त्वाचे असते. ना. सी. फडके म्हणतात, ''व्यक्तिदर्शन आणि कथारचना या दोहोंच्या साहाय्याने करावयाच्या असतात व लेखनाच्या या दोन उपांगांत लेखक जितके प्रावीण्य संपादन करेल तितकी त्याची कृती मनोहर होत जाईल.''[६] या दृष्टिकोनातून शंकर पाटलांच्या कथासाहित्यातील व्यक्तिचित्रणाचा अभ्यास करताना असे लक्षात येते की, त्यांच्या कथेतील व्यक्ती या संघर्ष करून जीवन जगणाऱ्या आहेत. 'वाटणी' या कथेतील शिवा आणि भीमा या दोघाही भावांचा जीवन जगण्यासाठीचा संघर्ष कायम सुरू असतो. म्हाताऱ्या आई–वडिलांच्या नावावरील जमीन आपल्यालाच मिळावी म्हणून त्यांना आपल्याकडे ठेवून घेण्यासाठी त्यांच्यात चढाओढ चालते. यासाठी ते दोघेही एकमेकांशी भांडतात. ''कुणाकडं राहायचं हे आई–वडिलांच्या मर्जीवर सोपवलं होतं. हिश्शाच्या आशेनं त्यांना सांभाळायला शिवा आणि भीमा दोघेही तयार होते; पण तर्कटी मुलाकडं राहायला ते तयार झाले नाहीत. म्हणजे शिवा आणि आई–बाप एक झाले आणि भीमा निराळा झाला.'' (कथा : वाटणी, कथासंग्रह : आभाळ, पृ. ५७)

शंकर पाटलांच्या व्यक्ती कष्ट करूनच जीवन जगणाऱ्या आहेत. त्यांच्या कथेतील ग्रामीण माणसाच्या वाट्याला कष्टाशिवाय दुसरे असे काही फारसे वाट्याला आलेले दिसत नाही. 'अर्धली'

Research Hub International Journal

या कथेतील धुळजी म्हशीचे पैसे देऊ शकत नसल्यामुळे बाकेराव गायकवाड त्याची म्हैस परत नेतो तेव्हा धुळजीच्या बायकोचा संवाद पाहण्यासारखा आहे. ''अण्णा, ऐका माझं ह्या चार पोरांच्या तोंडाकडं बघून तरी म्हस न्हेऊ नका. कधी न्हाईते एक दुभत्याचा थेंब त्यास्नी खायला मिळंल. त्यांच्या तोंडातला घास काढू नका. बघा गरिबाकडं आणि एवढी पुण्याई पदरात बांधून घ्या.'' (कथा : अर्धली, कथासंग्रह : आभाळ, पृ. ८९)

**प्रतिमा :**

प्रतिमेचा प्रवास ज्ञानाकडून अज्ञानाकडे असतो. जे व्यक्त करायला अतिशय गुंतागुंतीचे असते ते प्रतिमेच्या माध्यमातून व्यक्त होऊ शकते. तसेच प्रतिमेच्या माध्यमातून आपल्या भावभावनांची अभिव्यक्ती सहज होऊ शकते. याविषयी मधू कुलकर्णी म्हणतात, ''नवा आशय, नवी संकल्पना, नवा शब्द सुचणे हे प्रतिभेचे कार्य असते. नवसृजनाच्या वेळी कलावंताची कल्पनाशक्तीही कार्य करीत असते. केवळ शब्दांनी भागत नाही त्यावेळी कवी नव्या प्रतिमा वापरीत असतो.''[७] या अनुषंगाने शंकर पाटलांच्या कथांमधील काही प्रतिमांचा उल्लेख या ठिकाणी करता येईल. ''ती चुलीपुढं येऊन बसली आणि जळत असलेली भाकरी बघून तिचं काळीज होरपळलं!'' (कथा : तुझ्या गळ्याच्यान, कथासंग्रह : धुळाक्षरे, पृ. ९९), ''पोळी बघावी काठात आणि पोरगी बघावी ओठात.'' (कथा : जुगलबंदी, कथासंग्रह : जुगलबंदी, पृ. ५१), ''चंपी अगदी सुदमुद मीनाक्षीगत दिसतीया. न्हाई हो?'' (कथा : वेड, कथासंग्रह : श्रीगणेशा, पृ. २८), ''येळंला व्हायचा न्हाई त्याला पावना आनि रावळा म्हनायचं कारन काय? कशाचा मामा आनि गामा!'' (कथा : व्हला, कथासंग्रह : भेटीगाठी, पृ. ३५), ''अरं माझ्या कर्मा! असा कसा ह्यो धोंड गळ्यात बांधला माज्या! बायको दाल्ल्याचा कान धरती आन ती वाकवंल तसा ह्यो वाकतो! ह्या दाल्ल्याला म्हणावं तरी काय?'' (कथा : दोन बायकांचा दाल्ला, कथासंग्रह : धिंड, पृ. १२३) अशा काही प्रतिमांमधून वाचकांना वेगळा आनंद आणि अर्थबोध होतो.

**निष्कर्ष :**

- शंकर पाटलांनी ग्रामीण माणसाच्या प्रश्नांचा चिंतनीय वेध तर घेतलाच पण त्या प्रश्नांची उत्तरेही आपल्या कथेतून सुचविल्याचे दिसून येते.
- शंकर पाटलांनी कथेतून ग्रामीण स्त्रीच्या सुख—दु:खाचे चित्रण केले. त्याचवेळी स्वाभिमानी वृत्तीच्या स्त्रीचेही चित्रण केल्याचे दिसून येते.
- शंकर पाटलांची कथा जात, पंथ, धर्म या पलीकडे जाऊन मानवतावादी दृष्टिकोन स्वीकारणारी वाटते.
- शंकर पाटलांच्या कथेतील भाषा, म्हणी, वाक्प्रचार, सुविचार, सुभाषिते, प्रसंगी शिव्या, प्रतिमा, प्रतीके इत्यादींमुळे त्यांची कथा भारदस्त होताना दिसते.
- शंकर पाटलांनी कथेत निसर्ग, लोकांचे राहणीमान, खानपान, जीवन जगण्याच्या पद्धती, त्यांचे व्यवसाय, कृषिसंस्कृती, पशू—पक्षी, जनावरे इत्यादींचे हुबेहुब चित्रण केल्याचे दिसते.

**संदर्भ :**


- नागनाथ कोतापल्ले, 'नवकथाकार शंकर पाटील', सुविधा प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, २००२, पृ. १८३.
- सुधा जोशी, 'कथा संकल्पना आणि समीक्षा', मौज प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती, २०१२, पृ. १९.

- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, 'कथा : स्वरूप आणि रचना', नाशिक प्रकाशन, प्रथमावृत्ती, २००१, पृ. ७.
- ना. सी. फडके, 'लघुकथा लेखन : मंत्र आणि तंत्र', व्हिनस प्रकाशन, पुणे, १९६८, पृ. १४५.
- यशवंत मनोहर, 'नवे साहित्यशास्त्र', विजय प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, २००१, पृ. १७१.
- ना. सी. फडके, 'प्रतिभा साधन', देशमुख आणि कंपनी, सदाशिव पेठ, पुणे, पंधरावे पुनर्मुद्रण, १९९३, पृ. ९८.
- मधू कुलकर्णी, 'ललित साहित्यातील आकृतिबंधाची जडणघडण', शुभदा—सारस्वत पब्लिकेशन प्रा. लि., पुणे, १९८७, पृ. ६२.


Research Hub International Journal